# मेट्रो ३ : भुयारी स्थानकातील कामे अंतिम टप्प्यात

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेच्या ट्रायल रनला एकीकडे सुरुवात झाली असतानाच कफ परेडपासून ते विविध भुयारी स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे एमएमएआरसीएलने स्पष्ट केले आहे. एमएमआरसीएलच्या समाजमाध्यमांच्या लिंकवर भुयारी मेट्रो स्थानकांच्या कामाची प्रगती देण्यात आली आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने काही दिवसांपूर्वीच छत्रपती शिवाजी महाराज मेट्रो स्थानकाचे काम ८३ टक्के पूर्ण झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामध्ये एस्कलेटर, केबल्स आणि वातानुकूलित यंत्रणेच्या केबलची स्थापना ही कामे समाविष्ट आहेत. या स्थानकावर ६ विविध मार्गांनी प्रवेश / निर्गमन करता येणार आहे. १ लाख ६८ हजार ८५० प्रवाशांची ये-जा या स्थानकांवर अपेक्षित असून हे स्थानक मुंबई महानगरपालिका मुख्यालय, मध्य रेल्वेचे छत्रपती शिवाजी महाराज स्थानक यांना थेट जोडण्यात येणार आहे. तर दक्षिण मुंबईतील कफ परेड मेट्रो स्थानकातही उद्वाहनांचे काम वेगाने सुरू आहे. या स्थानकामुळे रेल्वेशी मागील ८६ वर्षांपासून न जोडलेला दक्षिण मुंबईतील महत्त्वाचा विभाग मुख्य महानगराशी जोडला जाणार आहे.

